पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, १६ सप्टेंबर २०२५

# बुद्धिबळ स्पर्धेत महाडेश्वर, गोरे अजिंक्य

## मनपास्तरीय १९ वर्षांखालील शालेय स्पर्धा : शंतनू पाटील, सिद्धी वरपे उपविजेते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व सेंट झेवियर्स हायस्कूल आयोजित शासकीय शालेय १९ वर्षांखालील मुलांच्या बुद्धिबळ स्पर्धेत मानस महाडेश्वर, तर मुलींमध्ये प्रणाली गोरे यांनी अजिंक्यपद मिळविले. तर शंतनू पाटील व सिद्धी वर्पे उपविजेते ठरले. स्पर्धा स्विस लीग पद्धतीने जलद बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय नियमानुसार घेण्यात आली.

स्पर्धेत मुलांच्या गटात अंतिम सहाव्या फेरीनंतर तृतीय मानांकित डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेजच्या मानस महाडेश्वर याने सहा पैकी सहा गुण प्राप्त केले, तर अग्रमानांकित कोल्हापूर हायस्कूलच्या शंतनू पाटील गुणांसह उपविजेतेपद मिळविले. गोखले कॉलेजच्या श्रेयस बाधवनकरने साडेचार गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. न्यू मॉडेल इंग्लिश स्कूलच्या यश भागवत व शांतिनिकेतनच्या अक्षय निल्ले चार गुणांसह अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळविला.




कोल्हापूर : महानगरपालिकास्तरीय शालेय १९ वर्षांखालील बुद्धिबळ स्पर्धेतील विजेते खेळाडू, पंच आदी.

मुलींच्या गटात राऊंड रॉबिन पद्धतीने एकूण सात फेऱ्यांत स्पर्धा झाली. अंतिम सातव्या फेरीनंतर विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या प्रणाली गोरे हिने सात पैकी साडेसहा गुण प्राप्त केले. पद्माराजे गर्ल्स हायस्कूलच्या सिद्धी वरपे हिने साडेपाच गुणांसह उपविजेतेपद मिळविले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार ज्युनिअर कॉलेजच्या वैष्णवी काळे पाच गुणांसह तृतीय स्थानी राहिली. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या स्वरूपा हजारे चार गुण मिळवून चौथा, तर पद्माराजे गर्ल्स हायस्कूलच्या आरोही जाधवने तीन गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळविला. स्पर्धेतील पाच खेळाडूंची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेसाठी क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले, फिडे इन्स्ट्रक्टर मनीष मारूलकर, आरती मोदी, किरण खटावकर, राहुल माने, सचिन भाट, प्रशांत पिसे, उत्कर्ष लोमटे, पल्लवी दिवाण, अल्ताफ कुरेशी, अनिश गांधी यांनी परिश्रम घेतले.

# राज्य बुद्धिबळ स्पर्धेसाठी ऋषीकेश कबनूरकची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



राज्यस्तरीय खुल्या क्लासिक रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेसाठी कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याची निवड झाली आहे. निवड चाचणी स्पर्धा ११ ते १३ सप्टेंबर अखेर मुंबई येथे झाली. कबनूरकरने पुण्याच्या ओम लामके याचा पराभव करून ६.५ गुण प्राप्त केले. त्याला ४५ फिडे गुण आणि दहा हजार रुपये, चषक देऊन गौरवण्यात आले.

या स्पर्धेत १२५ आंतरराष्ट्रीय फिडे मानांकित खेळाडूंसह एकूण १६४ खेळाडू सहभागी झाले होते. यातून चार खेळाडूंची राष्ट्रीय क्लासिकल बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा २१ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान आंध्र प्रदेश येथे होणार आहे. ताराबाई पार्क येथील अनुज ॲकॅडमीमध्ये ऋषीकेश सराव करत असून, तो स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्यकार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.